संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# भळभळती जखम आणि अर्धवट मलमपट्टी

**पाकिस्तानला** धडा शिकवण्याचे इशारे तर दिले जात आहेत परंतु हा धडा कोणत्या स्वरुपाचा असेल हे मात्र अजून स्पष्ट होताना दिसत नाही. पाकिस्तानची सर्व बाजूंनी कोंडी केली पाहिजे यात काही शंका नाही. कोंडी करताना जर फक्त पाकिस्तानचे पाणी अडवण्याचे किंवा क्रिकेट न खेळण्याचे अथवा त्याच्याबरोबरचे व्यापार संबंध कमी करण्याचे उपाय पुरेसे ठरणारे नाहीत. ४४ जवानांचे हौतात्म्य इतक्या किरकोळ उपायांनी भरून निघणारे नाही. या गोष्टी करण्याकरीता ४४ जवानांचे हौतात्म्य दिले गेलेले नाही. गेल्या तीन वर्षामध्ये दर दोन चार दिवसाआड एका जवानाचा बळी गेलेला आहे. सीमेपलिकडून वारंवार गोळीबार झालेला आहे. उरी आणि पठाणकोटचा मोठा दहशतवादी हल्लाही झालेला आहे. एवढेच नव्हे तर भारतीय जवानांचे शीर कापून त्यांचे धड परत पाठवण्याचे प्रकार याच क्रूर पाकिस्तानने केलेले आहे. त्याचवेळी हे उपाय करता आले असते. पाणी अडवणे अथवा व्यापार व्यवहार रद्द करणे हे उपाय आधीच करायला हवे होते. परंतु दर दोन दिवसाआड एक एक दोन दोन जवानांचे बळी जात राहिले. याचे महत्व सरकारला वाटले नाही. आणि आता एकाचवेळी ४४ जवानांचे पाकिस्तानने बळी घेतल्यानंतर सरकारला या उपायांची जाणीव झालेली दिसते. उरी आणि पठाणकोट यासारख्या भयानक हल्ल्यानंतरसुध्दा या पध्दतीने पाकिस्तानची कोंडी करता आली असती. परंतु सर्जिकल स्ट्राईक केला गेला. त्याचा इतका गवगवा केला गेला की जणुकाही भारताने पाकबरोबरचे मोठे युध्द जिंकले आहे. दहशतवाद्यांकडून पण काश्मिरमध्ये रोजच सर्जिकल स्ट्राईक सुरु आहे. पाकिस्तानपुरस्कृतच सर्जिकल स्ट्राईक म्हणावा लागतो. त्यांच्याकडून आपल्या जवानांवर रोज हल्ले होत असताना अनेक वर्षानंतर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकची एवढी दवंडी पिटण्याचे कोणतेच कारण नव्हते. भारताने उरी आणि पठाणकोटनंतर पाकिस्तानविरुध्द रोज सर्जिकल स्ट्राईक मोहीम चालवली असती तरीसुध्दा आज या ४४ जवानांचे प्राण वाचू शकले असते. दुर्दैवाने सरकारला पाकिस्तानच्या या कटाला तितक्याच तडाख्याने उत्तर द्यावे हे लक्षात आले नाही.

## निवडणुका की युध्द

सर्जिकलस्ट्राईक हा अतिशय चांगला पर्याय होता. यानंतर बराच काळ दहशतवाद्यांच्या आणि पाकिस्तानच्या कारवाया नियंत्रित झाल्या होत्या. मात्र त्याच सर्जिकल स्ट्राईकच्यावेळी याच मसुद अजहरने इतक्या स्पष्ट शब्दात भारताला ठणकावले होते की, सर्जिकल स्ट्राईक काय असतो हे आम्ही भारताला शिकवणार आहोत आणि दोन वर्षानंतर मसूद अजहरने आपला शब्द खरा करून दाखवलेला दिसतो. एवढेच नव्हे तर भविष्यकाळात असे आणखी हल्ले करून अशी दर्पोक्ती करायलाही त्याने मागेपुढे पाहिलेले नाही. भारताला इतक्या उघडपणाने पाकिस्तानातल्या दहशतवादी संघटना एक आव्हान देतात. एवढेच नव्हे तर ते प्रत्यक्षात उतरवून दाखवतात. यावरून त्यांच्या ताकदीचीही कल्पना येते. आज परिस्थिती अशी आहे की भारत दहशतवाद्यांनाही संपवू शकलेला नाही आणि पाकिस्तानला कायमचा धडाही शिकवू शकलेला नाही. अशावेळी जे काही मर्यादित उपाय भारताजवळ उरतात. त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची बाजू भक्कम करणे, नद्यांचे पाणी अडवणे, पाकिस्तानबरोबर क्रिकेट न खेळणे, पाकिस्तानला दिलेला विशेष राष्ट्राचा दर्जा काढून घेणे असे काहीसे फुटकळ उपाय भारताने चालवले आहेत. कदाचित पुढील काळातल्या मोठ्या उपायांची ही पूर्वतयारी आहे. असेही सांगितले जाऊ शकते. परंतु आगामी काळात येऊ घातलेल्या निवडणुकांची घाईगर्दी पाहाता सरकार फार मोठा निर्णय घेईल असे आता वाटत नाही. लोकांचा राग शांत करण्याकरीता आणि सरकार काही ना काही उपाय करीत आहे. हे दाखवण्याकरीता या प्रकारचे निर्णय घेतले जात आहेत. मात्र यामुळे सामान्य भारतीयांचे समाधान होण्याची शक्यता तर नाहीच. शिवाय लष्कराला जो बदला घ्यायचा आहे. तो संतापही शांत होण्याची शक्यता दिसत नाही. अनेक माजी लष्कर प्रमुखांच्या मते आणि संरक्षण विषयाचा अभ्यास करणाऱ्यांच्या मते भारताने पाकिस्तानशी निरनिराळे युद्ध करणे किंवा आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पाकिस्तानची कायमची कोंडी करणे हे दोनच प्रभावी उपाय असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. म्हणूनच सरकारकडून सुरु असलेली ही उपाययोजना ही केवळ भळभळत्या जखमेवरची अर्धवट मलमपट्टी ठरते.

## मोठा सर्जिकल स्ट्राईक हवा

आश्चर्याची गोष्ट अशी आहे की हा एवढा मोठा हल्ला झाल्यानंतर अनेक क्षेत्रातील लोकांच्या प्रतिक्रिया इतक्या दुर्दैवी वाटू लागतात आणि आपलाच देश आपलाच आत्मविश्वास कसा गमावू शकतो. याचीही अनुभूती यायला लागते. विशेषतः पाकिस्तानबरोबर विश्वचषक स्पर्धा खेळावी की खेळू नये याविषयी जोरदार चर्चा सुरु आहे. क्रिकेटपटू असलेल्या नवज्योत सिध्दूने आपला बुध्दूपणा तर दाखवलाच. शिवाय आता स्वतःला ज्येष्ठ क्रिकेटपटू समजून घेणाऱ्या सुनिल गावस्करनेसुध्दा जे मतप्रदर्शन केले आहे तेही आश्चर्यकारक ठरते. विश्वचषक स्पर्धेतून भारताने बाहेर पडू नये असे त्याचे मत आहे. परंतु संपूर्ण देश जो निर्णय घेईल त्यांच्याशी आपण सहमत आहोत. असे सांगून त्याने स्वतःची बाजू सावरून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु देशापेक्षा क्रिकेट मोठे नाही, अशी ठोस भूमिका त्याने घेतलेली नाही. पाकिस्तानशी असलेले सगळ्या प्रकारचे संबंध तोडून टाकणे आणि लष्करी मार्गाने किंवा मुत्सद्दीपणाने या देशाची नाकेबंदी करणे याशिवाय पर्याय राहिलेला नाही. स्थानिक काश्मिरी जनतेला दिलासा मिळेल परंतु तिथल्या फुटीरतावाद्यांचेही उच्चाटन होईल या उपायांचीही कठोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. मात्र भारताला युध्द टाळता येणार नाही किंवा मोठा सर्जिकल स्ट्राईक करून आपले नुकसान भरून काढावे लागेल.